अतितात्काळ/अर्थसंकल्प प्राथम्य.

विधानमंडळाच्या डिसेंबर, २०११ च्या अधिवेशनात सादर केलेले सन २०११-२०१२ चे खर्चाचे पूरक विवरणपत्र..

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,
परिपत्रक क्रमांक :पूरक-२०.१२/प्र.क्र. ३ /अर्थसंकल्प-३.
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १० जानेवारी, २०१२.

## परिपत्रक

सन २०११-२०१२ या वर्षाचे खर्चाचे पूरक विवरणपत्र दिनांक १२ डिसेंबर, २०११ रोजी विधानमंडळास सादर करण्यात आले. सदर पुरवणी खर्चास आता विधानसभेने मान्यता दिली आहे. दिनांक ३१ मार्च, २०१२ रोजी संपणा-या वित्तीय वर्षाच्या विनियोजनांमध्ये समाविष्ट करण्यासाठी, पुरवणी विनियोजन विधेयकास मा. राज्यपालांनी संमती दिली आहे. आणि ते, महाराष्ट्र (तृतीय पुरवणी) विनियोजन अधिनियम, २०११ (सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक-३४ म्हणून महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग-४, दिनांक २२ डिसेंबर, २०११ यामध्ये प्रसिध्द करण्यात आले आहे.

२. सदर खर्चाच्या पूरक विवरणपत्रात आकस्मिकता निधीतून घेतलेल्या अग्रिमांच्या भरपाईसाठी समाविष्ट करण्यात आलेल्या पूरक मागण्याच्या संदर्भात, योग्य ती कार्यवाही करण्याची विनंती महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-एक, महाराष्ट्र, मुंबई यांना करण्यात येत आहे. **तसेच, आकस्मिकता निधीतून काढलेला निधी यापुढे आकस्मिकता निधीच्या खर्च खाती न टाकता, एकत्रित निधीच्या खाती खर्ची टाकण्याच्या सूचना सर्व संबंधितांना तात्काळ देण्यात याव्यात.**

३. सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येत आहे की, त्यांनी पुरवणी विनियोजन अधिनियमानुसार मंजूर झालेल्या पूरक मागण्यांच्या रकमांचे ***तात्काळ*** वाटप करावे. तथापि, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग-पहिला, उप विभाग-एक ते पाच अन्वये आवश्यक तेथे वित्त विभागाची मान्यता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सु.प्र.कानडे)
सह सचिव, वित्त विभाग.

प्रति,
सहसचिव/उपसचिव (अर्थसंकल्प शाखा), सर्व मंत्रालयीन विभाग,मंत्रालय, मुंबई
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,विधानभवन, मुंबई.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)(व्हीएलसी शाखा) महाराष्ट्र, मुंबई (अधिनियमांच्या २५ प्रतींसह)
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)(व्हीएलसी शाखा) महाराष्ट्र, नागपूर,(अधिनियमांच्या २५ प्रतींसह)
महालेखापाल (लेखापरीक्षा),महाराष्ट्र,मुंबई (अधिनियमांच्या १५ प्रतींसह)
महालेखापाल (लेखापरीक्षा),महाराष्ट्र,नागपूर (अधिनियमांच्या ५ प्रतींसह)
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (अधिनियमांच्या ४० प्रतींसह)
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई (अधिनियमांच्या ५ प्रतींसह)
कार्यासन अधिकारी,प्रशासन-४, वित्त आयोग,वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
अर्थसंकल्प शाखेतील सर्व कार्यासने, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती, अर्थसंकल्प-३, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.